# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.07.2026** **वारःशुक्रवार**

---

1. हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता आणि स्थैर्यासाठी भारत आणि ऑस्ट्रेलियाची संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याच्या ऐतिहासिक संयुक्त जाहीरनाम्याला स्वीकृती
2. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर ओमानमध्ये दाखल
3. सरकार देशात 'E20' पेट्रोलच्या तुलनेत स्वस्त 'E85' इंधन सादर करण्याच्या तयारीत केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांची माहिती
4. महाराष्ट्रात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन आणि
5. मोरोक्कोला हरवून फ्रान्सचा फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**<u>भारत-ऑस्ट्रेलिया</u>**

संपूर्ण हिंद-प्रशांत क्षेत्रात शांतता आणि स्थैर्य सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं भारत आणि ऑस्ट्रेलियानं काल संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याच्या ऐतिहासिक संयुक्त जाहीरनाम्याला स्वीकृती दिली. तसंच खुल्या, मुक्त आणि सर्वसमावेशक हिंद-प्रशांत क्षेत्रास चालना देण्यासाठी सागरी सुरक्षा कृती आराखड्यासही दोन्ही देशांनी काल स्वीकृती दिली. मेलबर्न इथं झालेल्या ऑस्ट्रेलिया-भारत तिसऱ्या वार्षिक शिखर परिषदेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे ऑस्ट्रेलियाचे समपदस्थ अँथनी अल्बानीज यांच्यातील शिष्टमंडळ-स्तरीय चर्चेनंतर या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

यापरिषदेत दोन्ही नेत्यांनी शिष्टमंडळ स्तरीय चर्चेवेळी द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यासंदर्भात विचारविनिमय केला. 'इंडो-पॅसिफिक' हे केवळ दोन महासागरांच्या संगमाचं स्थान नाही, तर भारत आणि ऑस्ट्रेलियासारख्या समान विचारसरणीच्या लोकशाही देशांच्या सामायिक आकांक्षांचे ते प्रतीक आहे, असं पंतप्रधान मोदी चर्चेनंतरच्या संयुक्त पत्रकार परिषदेत म्हणाले.

ऑस्ट्रेलियाकडून भारताला युरेनियमचा दीर्घकालीन पुरवठा करण्याबाबतच्या प्रशासकीय व्यवस्थेला दोन्ही बाजूंनी अंतिम स्वरूप देण्यात आल्याचं परराष्ट्र व्यवहार खात्याचे सचिव विक्रम मिस्री यांनी सांगितलं. या करारामुळे भारताच्या स्वच्छ ऊर्जा कार्यक्रमाला बळकटी मिळण्याबरोबरच निव्वळ उत्सर्जन शून्यावर आणण्याच्या उद्दीष्टालाही हातभार लागणार आहे.

पंतप्रधान मोदी यांनी काल मेलबर्न इथं झालेल्या कार्यक्रमात भारतीय समुदायालाही संबोधित केलं. त्यांचे ऑस्ट्रेलियन समपदस्थही यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधानांच्या या अत्यंत यशस्वी ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात आज ते या देशाचे विरोधी पक्षनेचे अँगस टेलर यांची भेट घेणार आहेत. त्यानंतर ते त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्यात न्यूझीलंडला रवाना होतील.

**<u>जयशंकर ओमान</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर कुवेत भेट आटोपून ओमानमध्ये दाखल झाले आहेत. ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाचे महासंचालक शेख अहमद अल मस्कारी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. जयशंकर यांनी आपल्या 11 दिवसांच्या परदेश दौऱ्यात आतापर्यंत कतार, बहारिन, कुवेत या देशांना भेट दिली असून आता ते ओमान भेटीनंतर न्यूयॉर्कला आणि त्यानंतर ब्रुसेल्सला जाणार आहेत.

**<u>पुरीई 85</u>**

सरकार देशात 'E85' हे इंधन सादर करण्याच्या तयारीत असून हे इंधन सध्याच्या 'E20' पेट्रोलच्या तुलनेत प्रति लिटर सुमारे 20 रुपयांनी स्वस्त असेल, असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी म्हटलं आहे. एका

खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पुरी यांनी ही माहिती दिली. E85 इंधनाचा वापर केवळ त्यासाठीच विशेषरित्या तयार करण्यात आलेल्या वाहनांमध्येच करता येईल असंही पेट्रोलियम मंत्र्यांनी स्पष्ट केलं. ग्राहकांना आर्थिक दिलासा देण्याबरोबरच सरकारचा इथेनॉल मिश्रणाचा कार्यक्रम पुढे नेणे हा या प्रस्तावित निर्णयाचा उद्देश आहे. तसंच, इथेनॉल-मिश्रित पेट्रोलमुळे इंजिनचं नुकसान होण्याच्या किंवा वाहनाच्या कामगिरीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याच्या शंका फेटाळून लावत त्यांनी सरकारच्या व्यापक जैव-इंधन धोरणाचे समर्थन केलं.

**सीतारामन**

कुशल मनुष्यबळ, सक्षम संस्था आणि नवोन्मेषी परिसंस्था यामुळे भारत 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' साठी एक पसंतीचं ठिकाण म्हणून उदयास येत असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. देशात 21शे हून अधिक जीसीसी कार्यरत आहेत; त्याद्वारे 23 लाख व्यावसायिकांना थेट रोजगार मिळत असून त्यातून मिळणारं वार्षिक उत्पन्न सुमारे 100 अब्ज अमेरिकन डॉलर्सचं इतकं असल्याचं अर्थमंत्र्यांनी नवी दिल्ली इथं आयोजित 'सीआयआय नॅशनल जीसीसी बिझनेस समिट'ला संबोधित करताना सांगितलं. त्या म्हणाल्या की, सातत्याने नवनवीन आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांना चालना देण्यासाठी अभियांत्रिकी, संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता सायबर सुरक्षा, वित्त, उत्पादन डिझाइन आणि डेटा सायन्स या क्षेत्रांना एकत्र आणून 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' परिवर्तन घडवणारा घटक बनत बनल्या आहेत, असंही त्या म्हणाल्या.
भारताची जीसीसी परिसंस्था ही जगातील सर्वात मोठी 'संघटित ज्ञान निर्यात' असल्याचंही सीतारामन यांनी अधोरेखित केलं.

**एचएम**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत काल सीमावर्ती राज्यांच्या पोलीस अधीक्षकांची परिषद झाली. या परिषदेत जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तराखंड, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालचे पोलिस अधीक्षक सहभागी झाले. यावेळी सीमा सुरक्षा, घुसखोरी, अवैध स्थलांतर, ड्रोन धोका आणि अंमली पदार्थ तस्करी आदी मुद्यांवर चर्चा झाली.

**अली खामेनेई**

इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा काल मश्शाद दफनविधी पार पडला. त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी त्यांच्या समर्थकांची प्रचंड गर्दी झाली होती. इमाम रेझा या पवित्र स्मारकस्थळी अंतिम विधी झाल्यानंतर दार अल-दिक्र इथं त्यांचा पार्थिव देह दफन करण्यात आल्याचं इराणी प्रसारमाध्यमांमधील बातमीत म्हटलं आहे.

**भारतयुएन CRSV**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत झालेल्या चर्चेत भारतानं संघर्षाशी संबंधित लैंगिक हिंसाचाराचा अर्थात CRSV चा काल तीव्र निषेध केला. समुदायांना अधीन करून घेणं, असहमतीचा आवाज दडपण्यासाठी आणि मानवाला दुःख पोहोचवणाऱ्या युद्ध, दहशतवाद, छळ आणि राजकीय दडपशाहीचं साधन म्हणून अशा हिंसाचाराचा वापर केला जातो, असं संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी राजदूत पी. हरीश यांनी या विषयावरील चर्चेत बोलताना सांगितलं गुन्हेगारांवर कारवाई न होण्याच्या संस्कृतीमुळे अशा प्रकारचा हिंसाचार सुरूच असून भारत अशा घृणास्पद कृत्यांचा तीव्र निषेध करतो, असंही त्यांनी नमूद केलं. संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांच्या अहवालाचा संदर्भ देत, 2025 मध्ये अशा प्रकारच्या हिंसाचारात मोठी वाढ झाल्याचं दिसून असून याविरुद्ध तातडीनं सामूहिक कृती होण्याची गरज अधोरेखित झाली असल्याचंही ते म्हणाले.

**राष्ट्रीय महिला आयोग**

राष्ट्रीय महिला आयोगानं देशभरात वेगानं विस्तार होत असलेल्या सहाय्यक प्रजननतंत्रज्ञान क्षेत्रातल्या अनियमिततेबद्दल काल एकाउच्चस्तरीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजीन्यायाधीश, न्यायमूर्ती आशा मेनन या तज्ज्ञ समितीच्याअध्यक्षस्थानी असतील.

**समान नागरी**

महाराष्ट्रात समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केली. भारताच्या संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक राज्याने समान नागरी कायद्याचा विचार करावा, असे निर्देश आहेत. त्यानुसार 2026 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत या समितीची स्थापना करण्यात येत आहे असं फडणवीस यांनी सांगितलं.

ही समिती पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल राज्य शासनाला सादर करेल.

**तिरंदाजी**

स्पेन मधील माद्रिदमध्ये सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यात भारताच्या धीरज बोम्मदेवरा आणि कीर्ती शर्मा यांनी रिकर्व्ह मिश्र स्पर्धेत कास्यपदकाच्या प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला आहे. या जोडीला उपांत्य फेरीत चीनकडून पाच गुणांनी पराभव पत्करावा लागला. आता या जोडीचा सामना इटलीशी होईल. कंपाऊंड स्पर्धेत भारतीय महिला संघाने अंतिम फेरी गाठली असल्याने पदक निश्चिती झाली आहे.

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या काल झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्स ने मोरोक्को संघाचा 2-0 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात स्पेन आणि बेल्जियम, तिसऱ्या सामन्यात नॉर्वे विरुद्ध इंग्लंड आणि चौथ्या सामन्यात अर्जेंटीना विरुद्ध स्वित्झर्लंड अशा लढती होणार आहेत.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस राजस्थान, हरयाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागातून पुढे सरकला असून, आता त्याने संपूर्ण देश व्यापला आहे.

उत्तराखंड राज्यात आज अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून, 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. देशाच्या उर्वरित राज्यांत माध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.